



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०३ ● अंक : ००५ ● पुणे ● बुधवार, दि. १७ सप्टेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313





नऱ्हे मानाजी नगर ते नवले हॉस्पिटल रस्ता आता... 3





फूड अँड अॅग्री एक्स्पोचा पुण्यात समारोप 4


## ठळक बातम्या

### अकोल्यातील व्यक्तीचा नारायणगावात मृतदेह

पुणे (आरंभ पर्व) : नारायणगाव, ता. १६ : नारायणगाव (ता. जुन्नर) येथील मीना नदी पात्रातील कोल्हापूर बंधाऱ्याजवळ तुळशीराम भीमा मध्ये (वय ४५, रा. पांगरी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) या व्यक्तीचा मृतदेह मंगळवारी (ता. १६) सकाळी आढळून आला. मृत व्यक्तीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, घटनास्थळी मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या व्यक्तीचा मृत्यू नेमकी कशामुळे झाला? हा अपघात आहे की घातपात, याचा तपास नारायणगाव पोलिस ठाण्याच्या वतीने सुरू करण्यात आला असून, श्वान पथकाला पाचारण केले आहे.

### 'निवडणुकीत ठाकरे ब्रँडचा बँड वाजवला'

मुंबई (आरंभ पर्व) : आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. अनेक नेत्यांचे राज्यातील विविध भागांत दौरे सुरू असून पक्ष संघटनेचा आढावा घेतला जात आहे. या पार्श्वभूमीवर आज भारतीय जनता पक्षाचा मुंबईत विजय संकल्प मेळावा पार पडला. या मेळाव्यात बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. मुंबईतील बेस्ट सहकारी पतपेढीच्या निवडणुकीचा दाखला देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली. 'बेस्टच्या निवडणुकीत ठाकरे ब्रँडचा बँड वाजवला', असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

### हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांकडून सत्कार

अहिल्यानगर (आरंभ पर्व) : मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यातून न्यायालयाने मुक्तता केलेले हिंदुत्ववादी नेते सुधाकर चतुर्वेदी यांचा नगर शहरातील हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी खोट्या गुन्ह्यात अडकवल्याने गावोगावी सभा घेऊन, नागरिकांमध्ये जाऊन जनजागृती करणार असल्याचे सांगितले. तसेच माध्यमांशी बोलताना चतुर्वेदी यांनी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरकारने कटकारस्थान करत भगवा दहशतवादी ठरवून हिंदूंना अटक केली. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, गृहमंत्री कृपाशंकर सिंह व नबाब मलिक यांनी रा. स्व. संघाला बदनाम करण्यासाठी भगवा दहशतवाद असा आरोप केला. या प्रकरणाचे तपासी अधिकारी हेमंत करकरे यांची हत्याही त्यांनीच घडवून आणल्याचा खळबळजनक दावा चतुर्वेदी यांनी केला.

### चंद्रभागा पुन्हा दुथडी भरून वाहिली

पंढरपूर (आरंभ पर्व) : उजनी आणि वीर धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्याचा विसर्ग कमी केला आहे. त्यामुळे भीमा नदीला येणारे पुराचे संकट टळले आहे. उजनी आणि वीर धरणातून सोडण्यात आलेले १ लाख क्युसेक पाणी येथील नदीत पोहचले आहे. त्यामुळे येथील भीमा अर्थात चंद्रभागा नदी पुन्हा एकदा दुथडी भरून वाहू लागली आहे.

*सर्वोच्च न्यायालयाकडून ३१ जानेवारी २०२६ पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश*

# जानेवारीच्या शेवटच्या टप्प्यात मतदान

### प्रक्रिया ऑक्टोबरमध्ये पूर्ण होणार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचा निर्देश दिल्यानंतर आता पुणे महापालिकेत मतदान जानेवारीच्या शेवटच्या टप्प्यात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे निवडणुकीच्या तयारीचे टप्पे गतीने पुढे जात आहेत आणि किमान दीड महिना आधी निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची व्यवस्था करावी लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकाराला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे आयोजन करण्याबाबत कडक वक्तव्य केल्यामुळे केंद्र व राज्य पातळ्यावरील नियोजन तातडीचे झाले आहे. न्यायालयाने (ता. १६) झालेल्या सुनावणीनंतर निवडणुका घेण्यासाठी अखेरची मुदत ३१ जानेवारी २०२६ म्हणून दिली आहे. पुणे महापालिकेची प्रारूप प्रभागरचना तयार करण्यात आली असून त्यात एकंदर ४१ प्रभाग स्वरूप दिसतेः ४० प्रभाग चार-सदस्यीय आणि १ प्रभाग पाच-सदस्यीय अशी रचना प्रस्तावित आहे. प्रारूप जाहीर करून त्यावर हरकती (objections) मागवण्यात आल्या होत्या. शासनाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत एकूण 5,922 हरकतींची सुनावणी पार पडली आहे. या सुनावणीनंतरचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला आहे. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अंतिम अहवाल शासनाकडे सादर केल्यानंतर तो राज्य निवडणूक आयोगाकडे (State Election Commission) पाठवण्यात येईल — अशी अपेक्षा आहे की हा अहवाल २२ सप्टेंबरपर्यंत आयोगाकडे पोहोचवला जाईल. आयोगाने यानंतर आवश्यक ते बदल करून ३ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबर या कालावधीत अंतिम प्रभागरचना जाहीर करण्याचे नियोजन ठेवल्याचे प्रशासकीय वृत्त आहे. प्रभागरचना निश्चित झाल्यानंतर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अन्य मागासवर्गीय प्रवर्ग (OBC) व महिला आरक्षण यांचे आरक्षण निश्चित केले जाईल. ही सर्व आरक्षणविषयक प्रक्रिया ऑक्टोबर महिन्यात पार पडण्याची शक्यता आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर प्रत्येक प्रभागानिहाय मतदार यादी फोडणे, हरकती मागविणे व मतदार यादी अंतिम करणे या पुढील पायऱ्या पार पाडल्या जातील. प्रभागरचना व आरक्षण जाहीर होताच स्थानिक राजकीय चढ-उतार, उमेदवारीची घडी व पक्षीय संघटनात्मक कामकाज जलद गतीने सुरू होईल. आचारसंहिता लागू झाल्यानंतर प्रशासनाने निवडणुकांवरील नियम काटेकोरपणे लागू करावेत; त्यामुळे प्रचार-कार्यक्रम, घोषवाक्ये व धनवापर यावर निर्बंध लागतील. मतदार खात्यांतील अंतिम नोंदी व प्रभागनिहाय मतदार फोडणी न झाल्यास काही उमेदवार व पक्ष तक्रारी करु शकतात; त्यामुळे अधिक पारदर्शक व वेळीच अंतिम प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे. पुणे महापालिका निवडणुकीचे पुढील टप्पे आता त्वरित राबविण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रशासनाने वेळेवर प्रभागरचना व आरक्षण निश्चित करून निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केलेच तर दैनिक राजकीय हालचालींना वेग येईल आणि मतदानाच्या अंतिम तारखेबाबत शंका-समस्या दूर होण्यास मदत होईल.

**सध्या प्रशासनातल्या अंदाजानुसार पुणे महापालिकेतील मतदान जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. संभाव्य तारीखा म्हणून २३ जानेवारी २०२६ हे मुख्य नाव बोलले जात आहे; मात्र नियोजनात बदल झाल्यास मतदान १५ ते २० जानेवारी या दरम्यानही करता येऊ शकते. मतदान जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात झाल्यास पुढे फेब्रुवारी महिन्यात महापौर निवडणूक होईल, असे प्रशासकीय अभ्यासात सांगितले जात आहे.**

### आगामी टप्पे - आचारसंहिता व उमेदवारी

**प्रभागरचना व आरक्षण झाल्यानंतर निवडणूक आयोगाकडून निवडणुकीचे वेळापत्रक व नियमावली (Model Code of Conduct) जाहीर केली जाईल. प्रशासकीय सूत्रांनुसार डिसेंबर महिन्यात महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू होऊन उमेदवारी जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू होऊ शकते. त्यामुळे पक्ष व इच्छुक उमेदवारांना आता लवकरच प्रचार-तयारी व रणनीती आखणे सुरू करावे लागेल.**

### पदवीधर व शिक्षक मतदारसंघाचा कार्यक्रम जाहीर

**भारत निवडणूक आयोगाने 1 नोव्हेंबर 2025 या अर्हता दिनांकावर आधारित औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), पुणे व नागपूर विभागातील पदवीधर तसेच अमरावती व पुणे विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघांसाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे.**

पुरंदर विमानतळ भूसंपादनाला गती

## ७० टक्के शेतकऱ्यांची संमती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भूसंपादन प्रक्रियेला वेग आला आहे. दि. २६ ऑगस्टपासून सुरू झालेल्या संमतीपत्र स्वीकारण्याच्या प्रक्रियेत अवघ्या २० दिवसांत ७० टक्क्यांहून अधिक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी देण्यास संमती दर्शविली आहे. संमतीपत्र सादर करण्याची अंतिम मुदत दि. १८ सप्टेंबर असून, त्यानंतर आठवडाभरात जमीन मोजणीला सुरुवात होणार आहे. शेतकऱ्यांनी मुदतीत संमतीपत्र सादर करून १० टक्के विकसित भूखंडाचा परतावा निश्चित करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, पारगाव, मुंजवडी आणि खानवडी या सात गावांमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे तीन हजार एकर जमिनीचे भूसंपादन आवश्यक आहे. यापैकी दोन हजार एकरांहून अधिक जमिनीची संमतीपत्रे शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे सादर केली आहेत. विशेषत: मुंजवडी गावात ७६ हेक्टर जमिनीपैकी ७० हेक्टर जमिनीची संमतीपत्रे प्राप्त झाली आहेत. पूर्वीच्या अधिसूचनेनुसार २,६७३ हेक्टर क्षेत्र निश्चित करण्यात आले होते, परंतु आता त्यात १,३८८ हेक्टरची कपात करून क्षेत्र १,२८५ हेक्टर इतके निश्चित करण्यात आले आहे.

## *उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय!*

**छत्रपती संभाजीनगर (दै. आरंभ पर्व)**


एका महत्त्वपूर्ण न्यायनिवाड्यात, छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की, अवैध विवाह संबंधातून जन्मलेल्या मुलांनाही त्यांच्या वडिलांच्या मालमत्तेमध्ये कायदेशीर वाटा मिळवण्याचा अधिकार आहे. या निर्णयामुळे अशा मुलांना मोठा दिलासा मिळाला आहे. एका मुलीने तिच्या सावत्र आईविरुद्ध उदगीर येथील दिवाणी न्यायालयात वडिलांच्या मालमत्तेतील आपल्या हिश्यासाठी दावा दाखल केला होता. उदगीर न्यायालयाने त्या मुलीच्या बाजूने निकाल दिला आणि तिला वडिलांच्या मालमत्तेत वाटा देण्याचे निर्देश दिले. यानंतर जिल्हा न्यायालयानेही हा निकाल कायम ठेवला.

**● अवैध विवाह संबंधातून जन्मलेल्या मुलाला वडिलांच्या मालमत्तेत वाटा मिळण्याचा हक्क**

पुढील कारवाई म्हणून, सावत्र आईने उच्च न्यायालयात दुसरे अपील दाखल केले. तिने असा युक्तिवाद केला की ती मुलगी तिच्या वडिलांच्या दुसऱ्या, म्हणजेच अवैध विवाह संबंधातून झालेली असल्यामुळे तिला मालमत्तेत वाटा मागण्याचा अधिकार नाही. न्यायमूर्ती एस. पी. ब्रह्मे यांनी या प्रकरणाची सुनावणी करताना, सर्वोच्च न्यायालयाच्या "रेवनसिदपा विरुद्ध मल्लिकार्जुन" या गाजलेल्या प्रकरणाचा संदर्भ दिला.









# हजार कोटींचा निष्काळजीपणा

अकरा वर्षांपूर्वी मुंबईत मोनोरेल धावू लागली, तेव्हा सगळ्यांनी 'मोना डार्लिंग' म्हणून तिचं मोठं प्रेमभर कौतुक केलं होतं. अकरा वर्षांनंतर आता या 'मोना डार्लिंग'चे रंग उडाले असून ज्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे या मोनोरेलची जबाबदारी होती, त्यांनी गळ्यात मारल्यासारखी तिला अकरा वर्षं चालवली खरी, पण या क्षेत्रातील नवतंत्रज्ञान आणि आपल्याकडील पूर्वीचं तंत्रज्ञान याचा मेळ घालण्यासाठी जे करायला हवं होतं, ते केलं नाही हे आता उघड होऊ लागलं आहे. जी सेवा निर्माण केली, तिची योग्य काळजीही घ्यायला हवी, आपल्या सेवेची विश्वासार्हता वाढवत न्यायला हवी हे या प्राधिकरणाच्या गावीही नसल्याने तुरळक प्रवासी वाहून येणाऱ्या या मोनोरेलकडे सर्वार्थाने दुर्लक्ष झालं आहे. परिणामी त्यात वारंवार बिघाड आणि अपघात होऊ लागले आहेत. प्रत्येक बिघाड आणि अपघातावेळी कोणाला तरी 'बळीचा बकरा' बनवून वेळ मारून नेता येते, पण, तसेच प्रकार वारंवार घडू लागले, तर असे किती 'बकरे' करणार? कितींना निलंबित करणार? असे प्रश्न उपस्थित होणारच. त्यातून कारवाईच्या प्रामाणिकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होतात, हे लक्षात घ्यायला हवं. या मातब्बर प्राधिकरणाच्या अशा जागा दिवसेंदिवस अधिकाधिक उघड्या पडू लागल्या आहेत. गेल्या पाच वर्षांत प्राधिकरणाकडून सुरू असलेल्या विकासकामांत झालेल्या निष्काळजीपणाच्या याद्या केल्या, तर त्या बऱ्याच लांबलचक होतील. पायाभूत विकासासाठी सरकारकडून दिलं जात असलेलं प्राधान्य, त्यासाठी उपलब्ध करून दिला जात असलेला निधी आणि संबंधित वरिष्ठांना दिलं गेलेलं पूर्ण स्वातंत्र्य पाहता सरकार आणि जनतेची या प्राधिकरणाकडून विशेष अपेक्षा आहे. महामुंबईचं भवितव्य या प्राधिकरणाच्या हाती आहे. प्राधिकरणाचा कोणताही प्रकल्प काही हजार कोटींचाच असतो. मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्र्यांसारख्या अतिवरिष्ठ उच्चपदस्थांकडे त्याचं नेतृत्व असतं. अशा प्राधिकरणात दूरदृष्टीचा भाव असेल किंवा तांत्रिक बाबीही गांभीर्याने पाहिल्या जात नसतील, सुरक्षा यंत्रणेवर मोठा खर्च होऊनही



केवळ अव्यवस्थापनामुळे अनावस्था प्रसंग उद्भवत असतील, तर ही बाब निश्चितच गंभीर आहे. तिचा वरिष्ठ पातळीवर विचार झाल्याशिवाय राहणार नाही.

मुंबईकर एकतर मोनोरेलच्या वाट्याला जात नव्हते. वार्षिक २२० कोटी रुपयांचा तोटा करणारी ही मोनोरेल पावसाळ्याच्या काळात तातडीची पर्यायी व्यवस्था म्हणून वापरली जाऊ लागली. नेमक्या त्याच वेळी बिघाड आणि अपघातांची मालिका सुरू झाली. पूर्ण देशात मनोरेल फक्त मुंबईत आहे. गेल्या महिन्याभरात या छोट्याशा मार्गिकेवरील मोनोरेलमध्ये तीन वेळा बिघाड झाले आहेत. ऑगस्ट महिन्यात ज्या ठिकाणी ३०० प्रवाशांची काचा फोडून सुटका करावी लागली, त्याच ठिकाणी सोमवारी हा बिघाड झाला. वीज पुरवठा खंडित झाल्याने आपत्कालीन परिस्थिती उद्भवली असं सांगितलं जात आहे. आपत्कालीन परिस्थिती उद्भवण्याचं नेमकं कारण आज-उद्या उघड होईल; पण यावेळीही १७ प्रवाशांची कठीण प्रसंगातून सुटका करावी लागली, ही वस्तुस्थिती आहेच. प्राधिकरणाकडे एकूण आठ मोनोरेल होत्या. ऑगस्टमधील अपघातामुळे त्यातली एक मोनोरेल बाद झाली. उरलेल्या सातही गाड्या अकरा वर्षे वापरात आहेत. त्या जुन्या झाल्या आहेत. त्यांच्या तक्रारी सुरू होणार, तांत्रिक बिघाड होणार याची कल्पना प्राधिकरणालाही असल्याने त्यांनी तीनेक वर्षांपूर्वीच नव्या गाड्या खरेदी करण्याचा निर्णय घेतला. यावेळी मलेशियातल्या कंपनीला कंत्राट न देता स्वदेशी कंपनीला कंत्राट दिलं गेलं. दहापैकी सहा नव्या मोनोरेल दीड वर्षांपूर्वीच येऊन दाखलही झाल्या. पण या नव्या तंत्रज्ञानाने चालणाऱ्या असून आपल्याकडचं सध्याचं तंत्रज्ञान यापूर्वीचं आहे. त्यामुळे, या दोन तंत्रज्ञानांचा मेळ घालणं आवश्यक आहे. ते गेल्या दीड वर्षांपासून न झाल्याने ५८० कोटी रुपयांची गुंतवणूक तशीच, अंगावर धूळ खात यार्डामध्ये प्रतीक्षेत आहे. बाहेर जुन्या मोनोरेलच्या बिघाडांत वाढ होते आहे. प्राधिकरणाकडे मोठा तांत्रिक अधिकारी-कर्मचारी वर्ग आहे. सल्लागारांची मोठी मांदियाळी आहे. तरीही तंत्रज्ञानाच्या वापरातला हा घोळ कसा काय होतो? आणि तब्बल दीड वर्षे तो निस्तरला जात नाही, हे आश्चर्यच म्हणावं लागेल. जगात ४३ देशांत लघुमार्गांवर मोनोरेल वापरली जाते. खुद्द मलेशियातही तिचा वापर फार नाही. आपल्याकडेही तिचा विस्तार होण्याची शक्यता नाही. अशा परिस्थितीत कर्जबाजारी महाराष्ट्र राज्य या सेवेच्या आधुनिकीकरणासाठी, नवीनीकरणासाठी काही शे कोटी गुंतवून बसते; पण वर्ष - वर्ष त्याचा वापरही होऊ शकत नाही, ही गोंधळाची परिस्थिती भूषणावह नाही. प्रशासकीय पातळीवरचा हा गोंधळ जितक्या लवकर संपवता येईल, तितकं राज्याचं हित होईल.

मोनोरेलच्या धावत्या सेवेत अडथळे आल्याने त्याच्या मोठ्या बातम्या झाल्या. पण, मुंबई-ठाण्यात जिथे मेट्रोचं काम सुरू आहे, तिथे होणाऱ्या अपघातांची दखल गंभीरपणे घेतली जाते की नाही, हाही प्रश्नच आहे. मुंबई, ठाणे, भिवंडीतील अशा घटनांची यादीही बरीच मोठी आहे. रविवारी दुपारी घोडबंदर मार्गावर मेट्रोच्या सुरू असलेल्या कामावरून एक मोठा लोखंडी रॉड गाडीवर पडला आणि त्यामुळे गाडी चालकाला दुखापत झाली. भिवंडीत ५ ऑगस्ट रोजी रिक्षाने जाणाऱ्या प्रवाशाच्या डोक्यात लोखंडी रॉड घुसून मोठी दुखापत झाली. मेट्रोची ही कामं रहदारीच्या रस्त्यावर सुरू आहेत, हे मान्य. पण, ही वस्तुस्थिती आधीच लक्षात घेऊन त्यासाठी आवश्यक त्या सुरक्षा उपाययोजना आखायला नकोत का? एका बाजूला या प्राधिकरणाच्या प्रकल्पांच्या किमतीचे सुधारित आकडे आणि दुसऱ्या बाजूला हा निष्काळजीपणा-दोन्ही वाढतेच आहेत. सुजाण नागरिकांसाठी हे दोन्ही चिंतेचे विषय आहेत!

# सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस सरचिटणीसपदी नागेश चव्हाण

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

जवळगाव (ता. बार्शी) येथील मूळचे पुण्यातील उद्योजक आणि वाहतूक-माथाडी कामगार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष नागेश चव्हाण यांची सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस सरचिटणीस पदी निवड झाली आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार; प्रदेशाध्यक्ष खा . सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून ही घोषणा केली.





याप्रसंगी बोलताना पाटील म्हणाले की, "नागेश चव्हाण हे प्रस्थापित नेतृत्व असून त्यांनी बार्शी विधानसभा निवडणूक लढवली आहे. त्यांचा जिल्हाभरात मजबूत राजकीय संपर्क आहे. त्यामुळे पक्षाच्या उभारणीत त्यांचा मोलाचा सहभाग राहील आणि राष्ट्रवादीला ते अधिक बळकट करतील," असा विश्वास व्यक्त केला.

निवडीबाबत आपली प्रतिक्रिया देताना नागेश चव्हाण यांनी सांगितले की, "पक्षाने माझ्या कामाची दखल घेतली, त्याबद्दल मी सर्व नेत्यांचे आभार मानतो. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादीला भक्कम करण्यासाठी आणि बार्शीसह जिल्ह्यातील विकासकामे गतीमान करण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन." पक्षाने राबवलेल्या लाडकी बहीण योजना तसेच इतर कल्याणकारी उपक्रम तळागाळापर्यंत पोहोचवण्यावर आपला भर असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नागेश चव्हाण यांची निवड झाल्याने बार्शी तालुका तसेच जिल्हाभरातील कार्यकर्त्यांत आनंदाचे वातावरण आहे. नागेश चव्हाण हे सोलापूर जिल्हा रहिवासी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, छावा संघटनेचे सचिव, तसेच ह्यूमन राइट्स संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. यामुळे त्यांचा पक्षाला निश्चितपणे फायदा होणार आहे.

## राजीव पाटील सोशल अँड चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे शिक्षक दिन साजरा



**वारजे (दै. आरंभ पर्व)**

गुलाबराव वांजळे विद्यालयात राजीव पाटील सोशल अँड चॅरिटेबल फाउंडेशन तर्फे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात एकल पालकांच्या मुलांना शालेय साहित्याचे वाटप करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. तसेच विद्यालयात आयोजित रांगोळी स्पर्धेत सहभागी झालेल्या पालकांना देखील पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या विशेष प्रसंगी शाळा क्रमांक ६८B मधील विद्यार्थी मंत्री मंडळाचा शपथविधी देखील पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सद्भाव गतिविधी प्रमुख संभाजी भाग अमोल जोशी होते. प्रमुख पाहुणे म्हणून वारजे पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निलेश बडाख, कामगार नेते यशवंत ठोकळ, चेकमेट टाईम्स चे संपादक धनराज माने, युवा उद्योजक दत्ताभाऊ भिलारे, भाजपा सरचिटणीस चेतन गोंडाळ, अहिरे पुनर्वसनचे तंटामुक्ती अध्यक्ष किरण वांजळे, भाजपा चित्रपट कामगार आघाडी पुणे शहर अध्यक्ष राजीव पाटील, परशुराम यादव, शाळा क्रमांक १४८B च्या मुख्याध्यापिका सौ. माणिक गोरे, शाळा क्रमांक ६८B च्या मुख्याध्यापिका निशा बेंगळे तसेच शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. कल्पना ढमढेरे यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. मनिषा भोसले यांनी मानले.

# स्मशानभूमीत तातडीने उपायोजना करा

*तातडीने विकासकामांची माजी नगरसेवक बाळासाहेब नवले यांची मागणी*

- **अर्धवट बांधकाम, अपुरी लाईट, मोडकळीस आलेल्या वॉचमन रूमकडे वेधले लक्ष**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रयेजा सिटी, वडगाव येथील वीरशैव लिंगायत समाज स्मशानभूमीची पाहणी भाजपा खडकवासला विधानसभा समन्वयक तथा माजी नगरसेवक बाळासाहेबजी नवले यांनी आमदार भिमराव आण्णा तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

यावेळी पुणे महापालिका अधिकारी, समाजबांधवांसह भारतीय जनता युवा मोर्चा अध्यक्ष सारंग नवले हेही उपस्थित होते.



पाहणीदरम्यान स्मशानभूमीत अनेक गंभीर अडचणी उघड झाल्या. अर्धवट अवस्थेत असलेली सीमा भिंत, सर्वत्र वाढलेले गवत, पादचारी मार्गाची दुरवस्था, अपुरी लाईट व्यवस्था तसेच मोडकळीस आलेली वॉचमन रूम यामुळे स्मशानभूमीची स्थिती अत्यंत बिकट असल्याचे दिसून आले.

या सर्व बाबी महापालिका अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देत तातडीने आवश्यक दुरुस्ती व विकासकामे सुरू करावीत, अशी सूचना श्री. बाळासाहेब नवले यांनी दिली. समाजासाठी ही स्मशानभूमी महत्त्वाची असल्याने येथे सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.

"स्मशानभूमी हा समाजाचा भावनिक विषय आहे. येथे येणाऱ्या नागरिकांना अडचणी नकोत म्हणून आवश्यक सुविधा, भिंतींची मजबुती, चांगला पादचारी मार्ग, पुरेशी लाईट व्यवस्था आणि वॉचमन रूमची दुरुस्ती यासाठी तातडीने पावले उचलावीत," अशी ठाम भूमिका नवले यांनी व्यक्त केली.

प्रशासनाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून स्मशानभूमीचे काम पूर्ण करावे, अशी अपेक्षा यानिमित्त नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नवले यांनी केलेल्या सूचनावर लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती यानिमित्त मनपा अधिकाऱ्यांनी दिली.

# पाणीपुरवठा व कचरा समस्या भयानक

*माजी नगरसेवक हरिदास चरवड यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाकडून निवेदन*

- **आंबेगाव पठार परिसरातील मनपा प्रशासनास निवेदन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आंबेगाव पठार येथील सर्वे नं. 14, 15 व 16 परिसरातील पाणीपुरवठा व कचरा समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन नागरिकांच्या वतीने माजी नगरसेवक हरिदास कृष्णा चरवड यांच्या नेतृत्वाखाली पुणे महानगरपालिकेच्या संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना भेट देऊन चर्चा करण्यात आली.



या परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून अपुऱ्या आणि अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. यासंबंधी यापूर्वीही निवेदन देण्यात आले होते, मात्र समाधानकारक तोडगा न निघाल्याने हे दुसरे निवेदन सादर करण्यात आले.

तसेच, दररोज मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा संकलित होतो; परंतु घंटागाडी, डंपर, ढकलगाडी आदी वाहने पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे कचऱ्याचे नियोजन योग्य रीतीने होत नाही. त्यामुळे कचऱ्याचे ढीग साचून परिसरात अस्वच्छता निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. कचरा व्यवस्थापनासाठी तातडीने अतिरिक्त वाहनांची मागणी करण्यात आली.

यावेळी पाणीपुरवठा विभागाचे श्री. जगताप, घनकचरा विभागाचे कदम , भाजप नेते संदीप बेलदरे, बापू चोरघे, बाळासाहेब चोरघे, बाबर काका, देवगिरीकर साहेब, पवार, संदीप तुपे, सुनील ढगे व चंद्रकांत पवळे उपस्थित होते.

यावेळी पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी तांत्रिक तपासणीनंतर या समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले.




## फिक्कीच्या वार्षिक परिषदेत फिक्की - वझीर ॲडव्हायझर रिपोर्टचे प्रकाशन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फिक्की तर्फे आयोजित टॅग 2025 या वार्षिक वस्त्रोद्योग परिषदेत फिक्की - वझीर ॲडव्हायझर्स टेक्स्टाईल रिपोर्टचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते करण्यात आले. संजय सावकारे म्हणाले की,महाराष्ट्र राज्य आपल्या धोरणात्मक उपाययोजनांद्वारे देशांतर्गत व परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यावर तसेच कौशल्य विकास,संशोधन व विकास,पायाभूत सुविधांचा विकास यावर लक्ष केंद्रित करून जागतिक स्तरावरील स्पर्धात्मक वस्त्रोद्योग निर्माण होईल या दिशेने प्रयत्न करीत आहे.

ते म्हणाले की,प्रत्येक महसूल विभागात प्रत्येक एक असे सहा टेक्निकल टेक्स्टाईल पार्कस् स्थापन करण्याच्या दिशेने राज्य काम करीत असून महाराष्ट्राला टेक्निकल टेक्स्टाईल्सचे मुख्य केंद्र बनवण्याचे उद्दिष्ट आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### रस्त्यात पडले खड्डे, नागरिकांनी लावली झाडे; प्रशासनाचा निषेध

- **पोपटराव खेडेकर यांच्या नेतृत्वाखाली पाण्याच्या डबक्यात झाडे लावत गांधीगिरी**

**पुणे (आरंभ पर्व) :** सिंहगड रस्ता परिसरातील नऱ्हे गावाजवळील सेवा रस्त्यावर पावसाचे पाणी साचून मोठमोठी डबकी तयार झाली आहेत. त्यामुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून अपघातांचा धोका वाढला आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाने दखल न घेतल्याने संतप्त ग्रामस्थांनी डबक्यातच झाडे लावून एक आगळावेगळा निषेध नोंदवला. या आंदोलनाचे नेतृत्व माजी सरपंच पोपटराव खेडेकर यांनी केले तर माजी सभापती प्रभावती भुमकर यांची विशेष उपस्थिती होती. नागरिकांचे म्हणणे आहे की, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून टोल वसुली केली जाते; मात्र रस्त्यांच्या देखभालीकडे मात्र पूर्णतः दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे प्रवाशांचे व वाहनचालकांचे हाल होत आहेत. यावेळी माजी उपसरपंच राजाभाऊ वाडेकर, नारायण इंगळे, हरीभाऊ खेडेकर, प्रकाश खेडेकर, सदाशिव कुटे, बाळासाहेब भूरूक, संपत वालेकर, दीपक वालेकर, संभाजी काकडे, अजित कुटे यांच्यासह असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. आठवड्यामध्ये कार्यवाही झाली नाही तर मोठे आंदोलन करण्याचा इशारा यावेळी पोपटराव खेडेकर यांनी दिला आहे. पुणे महानगरपालिकेचे अधिकाऱ्यांनी या आठवड्याभरामध्ये कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### राजवीर पाटील पुन्हा एकदा 'अरण्य' चित्रपटा मधून पडद्यावर झळकणार



**पुणे (आरंभ पर्व) :** दिनांक १९ सप्टेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला एक आगळावेगळा चित्रपट "अरण्य" येत आहे. या चित्रपटात अनेक गाणी तसेच दर्जेदार कथानकाच्या माध्यमातून मनोरंजनासोबतच प्रेक्षकांना विचार करायला लावणारा संदेश दिला आहे. या चित्रपटात बालकलाकार राजवीर याने प्रभावी भूमिका साकारली असून, त्याची दमदार भूमिका पुन्हा एकदा प्रेक्षकांना पडद्यावर पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट शरद पाटील व अंजली पाटील यांच्या निर्मितीखाली तर दिग्दर्शन अमोल खरांबे यांनी केले आहे. "अरण्य" हा चित्रपट नक्कीच प्रेक्षकांच्या मनावर गारुड करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.



### सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचा प्रथम क्रमांक

**पुणे (आरंभ पर्व) :** भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने जाहीर केलेल्या NIRF 2025 रँकिंगमध्ये सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (SSPU), पुणेने सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक, तर सिंबायोसिस युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाइड सायन्सेस, इंदोरने दुसरे स्थान पटकावले. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे झालेल्या कार्यक्रमात शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी SSPU च्या प्र-कुलगुरू डॉ. स्वाती मुजुमदार यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान केले. या यशाबद्दल समाजातील विविध क्षेत्रांतून शुभेच्छांचा वर्षाव झाला. कुलपती डॉ. शां. बं. मुजुमदार यांनी हे यश "कौशल्याधारित शिक्षण व इंडस्ट्री सहकार्याचा परिणाम" असल्याचे सांगितले. डॉ. स्वाती मुजुमदार यांनी सलग दुसऱ्या वर्षी मिळालेल्या पहिल्या क्रमांकाबद्दल आनंद व्यक्त करत भविष्यातील योजनांचा आढावा घेतला. या वेळी इंडस्ट्री पार्टनर्स, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### प्राचार्या संध्या कांबळे यांचा शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मान

राजगुरुनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : राजगुरुनगर येथील खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचालित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या संध्या कांबळे यांना २०२५ च्या राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जन आरोग्यम परिवार संचालित जाणीव फाउंडेशन, संगमनेरच्या वतीने दरवर्षी शैक्षणिक, सामाजिक, कृषी व वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान केले जातात.यावर्षी विविध क्षेत्रातील एकूण ३५ मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. संगमनेर येथील थोरात महाविद्यालयाच्या दादा देशमुख सभागृहात हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. नाशिक पदवीधर मतदार संघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात उपस्थित होते. प्राचार्या संध्या कांबळे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल येथील खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर, उपाध्यक्ष अजित लुणावत, मानद सचिव एअर कमोडर गणेश जोशी, प्रदीप कासवा व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे व सर्व संचालक मंडळ, महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### महिलेचे दागिने चोरणारा गजाआड

पुणे (आरंभ पर्व) : पीएमपीएमएल प्रवासी महिलांकडील दागिने चोरीला जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. महापालिका भवन परिसरात सोमवारी पीएमपीएमएल प्रवासी महिलेच्या हातातील बांगडी कटरने तोडून पसार झालेल्या चोरट्याला पीएमपीएमएल वाहकाने पाठलाग करुन पकडले. वाहकाच्या तत्परतेमुळे चोरटा गजाआड झाल्याने प्रवाशांनी कौतुक केले. लखन सुहास जाधव (वय ३०, रा. सर्वोदय कॉलनी, मुंढवा) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे. या प्रकरणी त्याच्याबरोबर असलेला साथीदार चाँद शेख (रा. मुंढवा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोटाडा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com

Call Now ७२७६३१४१४२

### नऱ्हे मानाजी नगर ते नवले हॉस्पिटल रस्ता आता

# फक्त दुचाकी वाहनांसाठी खुला

## भूपेंद्र मोरे यांच्या ठिय्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाची तातडीची कार्यवाही

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे परिसरातील मानाजी नगर चौकातून नवले हॉस्पिटलकडे जाणारा रस्ता फक्त दुचाकी वाहनांसाठी खुला करावा या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला होता. या इशाऱ्याची तात्काळ दखल घेत पुणे महानगरपालिका व पोलीस प्रशासनाने बुधवारी रात्री पावसातच सिमेंट बोल्डर बसविण्याचे काम पूर्ण केले.

नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर गुरुवारी सकाळी मोरे यांनी नागरिकांशी संवाद साधला. या वेळी शिक्षणसम्राट डॉ. सुधाकरराव जाधवर, युवा उद्योजक स्वप्निल कुटे, रुग्णसेवक अमर बानाईत, तसेच ग्रीनलँड सोसायटीचे सदस्य यांच्यासोबत संवाद साधला.

नागरिकांनी या निर्णयाबद्दल मोरे यांचे व प्रशासनाचे आभार मानले.



यावेळी हरिश वैद्य, लतीफ शेख, सुशील भागवत, प्रशिक दारुंडे, सुनील पढेर,राजेश बोबडे, नितेश यादव, कमलेश हनसवळ, सुनील बर्गे, बाबासाहेब जगताप, प्रकाश पाटील, दिलीप मणकुमारे, सजित नोटे, सचिन तापरे, अजित हिरमसे, भूपेश शुक्ला यांसह अनेक नागरिक उपस्थित होते.

"एखादे काम करायचे ठरवले तर जिद्द ठेवावी लागते. त्या जिद्दीतूनच यश साकार होते, आगामी काळामध्ये ही जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी कायमस्वरूपी प्रयत्न केले जातील" असे प्रतिपादन भूपेंद्र मोरे यांनी यानिमित्त केले. यापूर्वीही त्यांनी आमरण उपोषण, रास्ता रोको अशा विविध आंदोलनांतून नागरिकांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. "विकासाचा 'मोरे पॅटर्न' आगामी काळातही जनहितार्थ सुरू राहील," असे ते म्हणाले.

या कामासाठी सहकार्य करणाऱ्या पुणे मनपा, सिंहगड रोड पोलीस स्टेशन व सर्व नऱ्हेकर नागरिकांचे त्यांनी विशेष आभार मानले.



## दांगट इस्टेट ते डेक्कन PMPML बस सेवा सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगर प्रादेशिक परिवहन महामंडळ (PMPML) ने नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला अधिक सोपा व सोयीस्कर बनवण्यासाठी नवीन मार्ग सेवा सुरू केली आहे. सेवेसाठी शासन नियुक्त समिती सदस्य श्री. सचिन विष्णू दांगट यांनी पाठपुरावा केला होता त्यास यश आले. नवीन मार्ग विस्तारात स्नेहा विहार (दांगट पाटील नगर) – दांगट इस्टेट – खान वस्ती – वारजे चौक – कर्वेनगर – SNDT – डेक्कन या मार्गाचा समावेश करण्यात आला आहे. या मार्गामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आणि कामकाजी लोकांना प्रवास अधिक सोपा, आरामदायी आणि परवडणारा होणार असून नागरिकांचा वेळही वाचणार आहे.

या बस सेवेच्या उद्घाटनावेळी PMPML चे वरिष्ठ अधिकारी, माजी नगरसेवक किरण बारटक्के, भाजप मंडलाध्यक्ष रुपेश घुले, उमेश सरपाटील, सुभाषभाऊ नाणेकर, अभिजीत धावडे, राजीवजी पाटील, दत्ताभाऊ कोल्हे, किरण हगवणे, संदीपआप्पा देशमुख, संतोष नाना देशमुख, रघु आप्पा दांगट, बंडू नाना दांगट यांच्यासह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. शासन नियुक्त समिती सदस्य, सचिन विष्णू दांगट यांनी सांगितले की, "नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाच्या सोयीसाठी आम्ही भविष्यातही अशाच सुविधा उपलब्ध करून देत राहू." या नव्या मार्गामुळे पुण्यातील नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक अनुभव अधिक सोपा, सुरक्षित आणि आरामदायी होणार आहे.

## वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी भेटवस्तू

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

वाफगाव (ता. खेड) येथील समाज कल्याण विभागातील वसतिगृहातील आदिवासी, गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी अत्याधुनिक कलर एलईडी दुरचित्रवाणी संच, गॅस शेगडी व इतर आवश्यक साहीत्य देण्यात आले. आनंद विहार ग्रुपचे राजेंद्र शिंदे हे गेल्या वीस वर्षांपासून या वसतिगृहासाठी व येथील विद्यार्थ्यांना गरजेच्या वस्तू व इतर सुविधा उपलब्ध देऊन विविध उपक्रम राबवितात. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. वाफगाव ( ता.खेड ) येथील रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा यशवंतराव होळकर विद्यालयात समाज कल्याण विभागाचे वसतिगृह आहे. अनुसूचित जाती जमाती, भटक्या विमुक्त जाती जमाती, इतर मागास, आर्थिकदृष्ट्या मागास गरीब व गरजू विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह चालवले जाते.या वसतिगृहाला काही दिवसापूर्वी १९८५ दहावीच्या आनंद विहार ग्रुपने भेट देऊन त्यांना देण्यात येणाऱ्या सोई - सुविधांची माहिती घेतली. यावेळी येथील विद्यार्थ्यांना काही वस्तूची गरज असल्याचे दिसून आले. त्यानुसार आनंद विहार ग्रुपच्या वतीने रंगीत दुरचित्रवाणी संच, गॅसशेगडी व इतर भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. यापूर्वी या ग्रूपच्या वतीने वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शालेय गणवेश, स्कुल बॅग, शालेय साहित्य देण्यात येत असून वसतिगृह कार्यालयासाठी कपाट व टेबल दिले आहेत.

## 'कूस' लघुपटाला राज्यस्तरीय तिसरे पारितोषिक

### 'राष्ट्रवादी'च्या चित्रपट व सांस्कृतिक विभागातर्फे राज्यस्तरीय लघुपट महोत्सव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ऊसतोड मजूर महिलांचे आरोग्य व त्यांचे जगणे मांडणाऱ्या 'कूस' या लघुपटाला राज्यस्तरीय उत्कृष्ट लघुपट म्हणून तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. या लघुपटाची निर्मिती उचित मीडिया सर्व्हिसेसने केली असून, दिग्दर्शन व लेखन डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार) चित्रपट व सांस्कृतिक विभागातर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त या लघुपट महोत्सवाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत आगीनफूल लघुपटास प्रथम, तर चंद्रलेखा लघुपटास द्वितीय



पारितोषिक मिळाले. राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ व प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते 'कूस' लघुपटाच्या टीमला सन्मानित करण्यात आले. घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्रात आयोजित कार्यक्रमावेळी ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे, चित्रपट महामंडळाचे मेघराज राजेभोसले, अभिनेत्री देविका दफ्तरदार, अभिनेते मिलिंद दास्ताने, सुनील गोडबोले, प्रभाकर मोरे, असित रेडीज, राष्ट्रवादीच्या नेत्या वैशाली नागवडे, रुपाली ठोंबरे, बाबा धुमाळ, संयोजक बाबासाहेब पाटील, नितीन धवणे पाटील, आदित्य संजयराव, अपेक्षा चव्हाण आदी उपस्थित होते. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर महिलांचे जगणे, त्यांच्या मासिक पाळीचा व आरोग्याचा प्रश्न, गर्भाशय पिशवी काढण्याचे प्रकार आणि त्यातून होणारी त्या स्त्रीची, कुटुंबाची कुचंबणा आदी गोष्टी या लघुपटातून मांडण्यात आल्या आहेत.

डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांच्याच अनेक पुरस्कारप्राप्त 'कूस' या कादंबरीवर आधारित हा लघुपट असून, निर्माता व लेखक-दिग्दर्शक ऊसतोड मजूर कुटुंबातून आल्याने अतिशय वास्तविक रूपात तो मांडला गेला आहे.

## रूबी हॉल क्लिनिक तर्फे शैक्षणिक सत्र आणि समुदाय जागरूकता कार्यक्रमांचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रूबी हॉल क्लिनिकने १२ सप्टेंबर रोजी जागतिक सेप्सिस दिनानिमित्त सेप्सिसच्या लवकर निदान आणि व्यवस्थापनाला बळकटी देण्यासाठी शैक्षणिक, जागरूकता आणि पोहोच उपक्रमांची यशस्वीरित्या सुरुवात केली. दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमात डॉक्टर, आरोग्य सेवा व्यावसायिक, रुग्ण आणि समुदाय एकत्र आले, जेणेकरून या 'सायलेंट किलर'शी लढा देण्यासाठी सामूहिक प्रयत्न केले जातील. या कार्यक्रमाला रूबी हॉल क्लिनिक, पुणे येथील फिजिशियन आणि विश्वस्त डॉ. सायमन ग्रँट, मुख्य कामकाज अधिकारी श्री. उर्वाकाश भोटे आणि आयसीयूच्या उपसंचालिका व




सल्लागार ॲनेस्थेसियोलॉजिस्ट डॉ. तनिमा बारोनिया यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण डॉक्टर्स आणि आरोग्य सेवा व्यावसायिकांसाठी एक शैक्षणिक सीएमई सत्र होते, ज्यात सेप्सिसच्या काळजीमधील नवीनतम अद्यतने, पुरावा-आधारित पद्धती आणि वेळेवर हस्तक्षेपासाठीच्या रणनीतींवर लक्ष केंद्रित केले गेले.

सार्वजनिक सहभागाला आणखी बळकटी देण्यासाठी, हॉस्पिटलच्या लॉबीमध्ये माहिती आणि जागरूकता स्टॉल्स लावण्यात आले होते, जिथे रुग्ण, कुटुंबीय आणि अभ्यागतांना शैक्षणिक पत्रके आणि संसाधने वितरित करण्यात आली. आयसीयू टीमने समुदायापर्यंत आपले प्रयत्न पोहोचवले, जिथे सेप्सिस प्रतिबंध, लवकर ओळख आणि वेळेवर वैद्यकीय मदत घेण्याच्या महत्त्वाविषयी व्यावहारिक माहिती दिली.

या उपक्रमाबद्दल बोलताना, रूबी हॉल क्लिनिकचे क्रिटिकल केअर मेडिसिनच्या संचालक डॉ. प्राची साठे म्हणाल्या" सेप्सिस जगभरात टाळता येण्याजोग्या मृत्यूंच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे, तरीही याबद्दलची जागरूकता कमी आहे. अशा उपक्रमांद्वारे, आम्ही ज्ञानातील अंतर भरून काढण्याचे, आरोग्य सेवा व्यावसायिक आणि जनतेला सक्षम बनवण्याचे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, लवकर निदान आणि जलद उपचारांद्वारे जीव वाचवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे." रूबी हॉल क्लिनिकचे मुख्य हृदयरोगतज्ञ, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. परवेझ ग्रँट यांनी पुढे सांगितले "रूबी हॉल क्लिनिकमध्ये, आमचा विश्वास आहे की सेप्सिसशी लढा देण्यासाठी बहु-आयामी दृष्टिकोन आवश्यक आहे—नैदानिक उत्कृष्टता, सतत शिक्षण आणि सामुदायिक सहभाग. आमची वचनबद्धता फक्त या दिवसापुरती मर्यादित नाही; आम्ही आमच्या टीम्सना ज्या प्रकारे प्रशिक्षण देतो, रुग्णांशी संवाद साधतो आणि समाजामध्ये जागरूकता वाढवतो, त्या प्रत्येक दिवशी ती सुरू राहते. एकत्र येऊन, आपण सेप्सिसचा भार कमी करू शकतो आणि करायलाच हवा."

या सर्वसमावेशक कार्यक्रमाद्वारे, रूबी हॉल क्लिनिकने सेप्सिस काळजी वाढवण्याची आपली वचनबद्धता पुन्हा एकदा दृढ केली आणि हे सुनिश्चित केले की वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत व्यक्ती आणि समुदाय दोघेही या गंभीर आरोग्य धोक्याला ओळखण्यासाठी आणि त्याविरुद्ध कार्य करण्यासाठी सुसज्ज आहेत.

## पुणे जिल्हा परिषदेकडून उत्कृष्ट शिक्षक, शाळांचा सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिक्षक दिनानिमित्त पुणे जिल्हा परिषदेने जिल्ह्यातील ९ शाळांना 'अध्यक्ष चषक' पुरस्कार आणि १३ तालुक्यांमधील २७ शिक्षकांना जिल्हास्तरीय 'आदर्श शिक्षक' पुरस्कार जाहीर केला. खेड तालुक्यातील वाफगाव आणि नाणेकरवाडी येथील जिल्हा परिषद शाळांना 'अध्यक्ष चषक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. धानोरे येथील शैला मुकुंद गावडे आणि दावडमळा येथील वर्षाराणी तुषार वाटेकर-खळेकर यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांनी दिली.



मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या अध्यक्षतेखालील समितीने शाळांची तपासणी करून पुरस्कारासाठी वर्षाराणी वाटेकर यांची निवड केली, अशी माहिती शिक्षणाधिकारी संजय नाईक यांनी दिली.

गुणवंत केंद्रप्रमुख पुरस्कार : निर्मला दिलीप काळे (केंद्र कान्हे, ता. मावळ) जिल्हास्तरीय 'आदर्श शिक्षक' पुरस्कारप्राप्त शिक्षक विजय सोपानराव वळसे (गाढवे गोरडेमळा, ता. आंबेगाव), संगीता बबन वळसे (मोरडेवाडी, ता. आंबेगाव), वनिता सचिन जाधव (काटेवाडी, ता. बारामती), शांता संदीप बालगुडे (सांगवी, ता. बारामती), गणेश अशोक बोरसे (म्हाळवाडी, ता. भोर),

अश्विनी संजय पवार (उत्रोली, ता. भोर), धनश्री माणिक पासलकर (शेलार मेमाणवाडी, ता. दौंड), रेखा राजू वाखारे (वडगाव बांडे, ता. दौड), कुरेशी सलाउद्दीन शेख (लोणी, ता. हवेली), मीना अशोक म्हसे (जगतापवाडी, ता. हवेली), प्रमिला संभाजी खाडे (मंडलिकवस्ती, ता. इंदापूर), शेख ताहेस बकस (दत्तवाडी, ता. इंदापूर), वैभव बबनराव सदाकाळ (येणरे, ता. जुन्नर), मधुकर ज्ञानदेव गायकवाड (उंब्रज नं. १, ता. जुन्नर), शैला मुकुंद गावडे (धानोरे, ता. खेड), वर्षाराणी तुषार वाटेकर-खळेकर (दावडमळा, ता. खेड), पोपटराव रामचंद्र चौगुले (धामणे, ता. मावळ), अक्षता सचिन अंबुळे (कान्हे, ता. मावळ), रियाज नसीर शेख (भूगाव क्र. २, ता. मुळशी), सलीम हसन तांबोळी (मुठा, ता. मुळशी),

मनोजकुमार भालचंद्र सटाल (नारायणपूर, ता. पुरंदर), सचिन मनोहर बोरावके (पिसरेवाडी, ता. पुरंदर), मोहन गोविंद जगताप (चांबळी, ता. पुरंदर), गोरख भाऊसाहेब काळे (वावळेवाडी, ता. शिरूर), संतोष पांडुरंग वेताळ (कोयाळी, ता. शिरूर).

शबाना जावेद खान (पानशेत, ता. राजगड), शुभांगी दुर्योधन भोसले (निगडे बुद्रुक, ता. राजगड). अध्यक्ष चषक पुरस्कार प्राप्त शाळाः इयत्ता १ली ते ५वी जि. प. प्राथमिक शाळा, आर्वी केंद्र (जुन्नर), भांडगाव (दौंड), पाचर्णेवाडी (शिरूर), गौराईमळा (इंदापूर), वाफगाव (खेड). इयत्ता १ ली ते ८वी (उच्च प्राथमिक) जि. प. प्राथमिक शाळा वसेवाडी (शिरूर), नाणेकरवाडी (खेड), मांजरवाडी (जुन्नर), रुळे (वेल्हे).

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
१.समाजसेवेची आवड
२.जनसंपर्क
३.स्मार्ट फोन असणे आवश्यक
४.सोशल मीडियाचा वापर करता येणे
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272


## थोडक्यात पण महत्वाचे



## लोणीकंद जिल्हा परिषद शाळेत चलते-फिरते कौशल्य प्रशिक्षण

वाघोली (आरंभ पर्व) : लोणीकंद येथील पी.एम.श्री. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इंडियाला मदतीचा हात (Lend A Hand India) या संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या 'पुणे मॉडेल स्कूल' या उपक्रमांतर्गत चलते-फिरते कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम पार पडले. इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांना विशेष सज्ज बसमधून प्रत्यक्ष कौशल्याधारित शिक्षण देण्यात आले.या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व व्यावहारिक शिक्षणाची ओळख मिळून त्यांच्या आत्मविश्वासात व कौशल्यविकासात मोठी भर पडणार आहे. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी तसेच गावातील आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी कार्यशाळा, सुतारकाम, वेल्डिंग व फॅब्रिकेशन, ऑटोमोबाईल, मशीन मॅन्युफॅक्चरिंग, विद्युत व पर्यावरण या विषयांत घरगुती उपकरणे दुरुस्ती, आतील वायरिंग, वॉटर प्युरिफायर दुरुस्ती, इलेक्ट्रोमेकॅनिकल व रोबोटिक्स, ॲप डेव्हलपमेंट, थ्रीडी प्रिंटिंग यांसारख्या आधुनिक कौशल्यांचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान, बेकिंग व कन्फेक्शनरी, स्वयंपाकाची मूलभूत तत्त्वे, फूड सायन्स व टेक्नॉलॉजी, बागकाम, रोपवाटिका व्यवस्थापन याविषयीही प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्या बरोबरच रोजगाराभिमुख शिक्षणाची पायाभरणी मदत होणार आहे. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या संकल्पनेतून सदर उपक्रम जिल्ह्यातील मॉडेल स्कूलमध्ये सुरु झाला असून शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, गटशिक्षणाधिकारी ज्ञानदेव खोसे, हवेली विस्ताराधिकारी शंकर मुंढे, केंद्रप्रमुख शांता इचके,मुख्याध्यापिका जयश्री अनुसे यांचेयासाठी सहकार्य लाभले.

## भिकाजी वाघमारे यांचे निधन



वाघोली (आरंभ पर्व) : वाघोली येथील आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ व्यक्तिमत्व भिकाजी बाबुराव वाघमारे, वय (वर्ष ८५) यांचे शनिवार (दि.१३) रोजी अकस्मात निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माजी सरपंच संजीवनी सर्जेराव वाघमारे यांचे सासरे व माजी पंचायत समिती सदस्य तथा कोरेगाव भीमा विजयस्तंभ सेवा समिती संस्थापक अध्यक्ष सर्जेराव वाघमारे यांचे ते वडील होते.

## कात्रज ते हिंजवडी डबलडेकरची चाचणी

पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहरातील नागरिकांची वाहतूक कोंडीमधून सुटका होण्याच्या पुणे महापालिका आणि पीएमपीएल मार्फत प्रयत्न करण्यात येत आहे.त्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील आयटी हब म्हणून ओळख असणाऱ्या हिंजवडी,खराडी,मगरपट्टा या परिसरात माहिती तंत्रज्ञान विभागात काम करणाऱ्या नोकरदार व्यक्तीसाठी पीएमपीएमएलच्या माध्यमातून इलेक्ट्रिक डबलडेकर बस ची सेवा दिली जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आज कात्रज आगार ते हिंजवडी दरम्यान डबलडेकर बस ची पीएमपीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांच्या उपस्थितीमध्ये यशस्वी चाचणी पार पडली.







# पुर्व हवेलीत विद्युत कर्मचाऱ्यांची उल्लेखनीय कामगिरी

## गुडघ्याभर पाण्यात केला विदयुत प्रवाह सुरुळीत

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

रविवार दिनांक १४-०९-२०२५ रोजी दुपारी पावसाने पुर्व हवेलीतील लोणी काळभोर ,कदमवाकवस्ती,कुंजीरवाडी सोरतापवाडी ,उरुळी कांचन , पेठ ,नायगाव , वळती शिंदवणे ,आळंदी म्हातोबाची ,थेऊर , टिळेकरवाडी इत्यादी भागात सुरुवात केली परंतु रात्री बारा वाजता नंतर ढगफुटी सदृश्य पावसाने जोरदार वरील सर्व भागाला जोडपले त्यातच सर्व भागातील सर्व भागातील वीजपुरवठा खंडित झाला. पावसाचा जोर एवढा होता की रस्त्यावरून पाणी वाहू लागले आणि विजेच्या कडकडाटात पहाटेपर्यंत पावसाचे प्रमाण कसलेही कमी झाले नाही. पाणी एवढे जास्त वाढले की लोणी काळभोर गावातील रस्ते बंद झाले होते .त्यामुळे वायरमनला सुद्धा घराबाहेर पडता येत नव्हते तरीही सोमवार दिनांक १५-०९-२०२५ रोजी सकाळी सात वाजता टू व्हीलर वर काही वायरमन पाण्यातून मार्ग काढत पुढे पुढे निघाले. ग्राहकांनी फोन करून सांगितले की आमच्या घरात पाणी आले आहे मीटर पर्यंत पाणी आलेले आहे कृपया वीज पुरवठा चालू करू नका. त्यामुळे अशा परिस्थितीत कुठेही वीज चालू राहणार नाही याची काळजी घेण्यात आली. या पावसामुळे लोणी काळभोर परिसरात एमआयटी कॉर्नर, आयओसीएल कंपनी आणि कवडीपाट टोल नाका या परिसरात उच्च दाब वीज वाहिनीचे सुमारे सात ते आठ खांब पडलेले व वाकलेल्या स्थितीत दिसले . लोणी काळभोर ग्रामपंचायत व कदमवाकवस्ती ग्रामपंचायत येथे एकूण २२००० ग्राहकांना वीज पुरवठा मिळू न शकल्याने महावितरण कंपनीचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यानंतर उप कार्यकारी अभियंता महेश धाडवे यांनी लोणी काळभोरचा पूर्ण आढावा घेऊन सहाय्यक अभियंता विक्रांत ओहोळ व त्यांचे शाखेचे कर्मचारी यांना वीजपुरवठा सुरक्षितपणे सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यासाठी अधिकृत कंत्राटदार यांना त्वरित उपस्थित राहण्याचे सांगण्यात आले. जसे जसे साचलेले पाणी कमी होऊ लागले तसें लोणी काळभोर शाखा कार्यालयाचे लाईनमन पी एस खरमाटे यांनी सर्व स्टाफ यांना सोबत घेऊन फुरसुंगी येथून येणारे दोन फिडर याची पाहणी करायला लावली व दोन गट केले. संभाजीनगर येथील वायरमन सिराज सय्यद आणि इंदिरानगर येथील वायरमन अबू सय्यद यांनी सुरुवातीचा भाग चालू केला. त्यानंतर रामदारा येथील वायरमन योगेश गिरी आणि लोणी गावातील वायरमन अजय डोंगरे यांनी पुढील भाग पाहणी करत व सर्वांशी सांघिक पद्धतीने मार्गदर्शन करत पुढील भाग सुरू केला. टोलनाका येथे जास्त पडझड झाली असल्याने तेथील वायरमन पांडुरंग खरात अक्षय पाटील आणि रोहित काळभोर यांनी तातडीने क्रेन बोलावून वीज वाहिनीवर पडलेली झाडे तोडण्यास सुरुवात केली. मुख्य



बाजारपेठ असलेले लोणी गावठाण लोणी कॉर्नर येथील वीज पुरवठा सुरू करताना अमोल शेलार,योगेश गाडेकर यांनी योग्य वेळी पर्यायी वीज वाहिनी कंत्राट दाराकडून ओढून घेतली. माळी मळा येथील वायरमन दादा चौधरी यांनी ठिकठिकाणी ट्रांसफार्मर बंद करून ठेवले व त्यांचे जोडीदार मुस्तफा शेख यांच्याशी चर्चा करून राहिंज वस्ती व माळी मळा परिसर सुरू करून वीज पुरवठा सुरळीत केला. तसेच वायरमन विशाल मोरे,हिमांशू काळभोर,दादा आगळे यांनी सुद्धा त्यांच्या परिसरातील वीजपुरवठा सुरक्षितपणे सुरळीत केला. साधारण दहा ते बारा तासात पूर्ण लोणी काळभोर येथील वीजपुरवठा पूर्ववत झाला अनेक नागरिक, प्रतिनिधींनी व पत्रकार वर्गाने वेळोवेळी सर्व कर्मचाऱ्यांना साथ दिली . त्यामुळेच काही निवडक ग्राहक सोडता पूर्ण लोणी काळभोर ग्रामपंचायत व कदमवाकवस्ती ग्रामपंचायत येथील वीज पुरवठा सुरळीत करण्यात महावितरण लोणी काळभोर शाखा यांना शक्य झाले. तसेच कुंजीरवाडी येथे महावितरण शाखा कानिष्ठ अभियंता श एस आलदर , लाईनमन मंगेश पारखी, शरद वाघमारे, निलेश भोंडवे, किरण मोहिते अंचल बागडे, दीपक केंद्रे, सतीश चव्हाण, नाथा माकर,किरण झेंडे यांनी अथक प्रयत्न करुन घुडघ्याभर पाण्यात उतरून वीज पुरवठा सुरुळीत केला .या सर्वांच्या कामगिरी बद्दल पुर्व हवेलीतुन विदयुत ऑफीसर व कर्मचारी यांचे कौतुक होत आहे .

# फूड अँड ॲग्री एक्स्पोचा पुण्यात समारोप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कर्वेनगर येथील महालक्ष्मी लॉन्स येथे भव्य दिमाखात फूड अँड ॲग्री एक्स्पो २०२५ पार पडला. या एक्स्पोचे उद्घाटन खासदार मधुरा (मेधा) ताई कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनात विविध अन्नप्रक्रिया उत्पादने, कृषी नवकल्पना, फूड व ॲग्री FMCG उत्पादने तसेच प्रक्रिया तंत्रज्ञान व सेवा यांचे दर्शन घडले. हजारो व्यावसायिक, शेतकरी व नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट दिली. या एक्स्पोमध्ये विशेष आकर्षण ठरलेले बिझनेस समिट यशस्वीरीत्या पार पडले. या समिटमध्ये सेंद्रिय शेती, स्टार्टअप्ससाठी निधी,



फूडप्रेन्युअर्ससाठी नव्या संधी, बाजारपेठेचे संशोधन यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली. तसेच स्वतःच्या उत्पादनासाठी बाजारपेठ कशी निर्माण करावी यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. याशिवाय १३ सप्टेंबर रोजी सकाळी ११:३० ते दुपारी १:३० या वेळेत बायर–सेलर मीट आयोजित करण्यात आली होती. या मीटमध्ये ७० हून अधिक बायर–सेलर सहभागी झाले आणि महत्त्वपूर्ण व्यावसायिक करारांवर चर्चा झाली.

विशेष म्हणजे, सर्व सहभागी व प्रदर्शकांना या मीटमधून अधिक B2B कनेक्शन मिळाले तसेच त्यांच्या उत्पादनांसाठी नवीन संधीही निर्माण झाल्या. Maitri Excellence यांच्या पुढाकाराने आयोजित हा उपक्रम व्यावसायिकांसह सर्वसामान्य नागरिकांसाठीही एक समृद्ध अनुभव ठरला.

## १८वा यलो रिबन एनजीओ फेअर (YRNF) – ग्रामीण भारत महोत्सव

- **उपजीविका, हस्तकला आणि शाश्वततेचा उत्सव**
- **१८ ते २२ सप्टेंबर २०२५ | क्रिएटिसिटी, येरवडा, पुणे | सकाळी ११ ते रात्री ९ | मोफत प्रवेश**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इशान्या फाउंडेशन आणि नाबार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने १८ वा यलो रिबन एनजीओ फेअर (YRNF) – ग्रामीण भारत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. हा पाच दिवसीय महोत्सव भारताच्या समृद्ध परंपरा, शाश्वत हस्तकला आणि समुदाय-आधारित नवकल्पना यांचा उत्सव असून १८ ते २२ सप्टेंबर २०२५ दरम्यान क्रिएटिसिटी, येरवडा, पुणे येथे सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.या महोत्सवाचे उद्घाटन स्वदेश फाउंडेशनच्या ट्रस्टी श्रीमती झरीना स्क्रूवाला, इशान्या फाउंडेशनच्या ट्रस्टी श्रीमती पारुल मेहता आणि नाबार्डच्या सीजीएम श्रीमती रश्मी दराड यांच्या हस्ते होणार आहे. यंदाच्या महोत्सवाची संकल्पना "एक्सप्लोर, एम्ब्रेस, इव्हॉल्व" असून ती कारागीर, शेतकरी, विणकर, स्वयंसेवी संस्था (NGO) आणि सामाजिक उपक्रम यांच्या प्रेरणादायी प्रवासावर प्रकाश टाकते.

## शिरूरमध्ये तरुण बुडाला; १६३ कुटुंबे तात्पुरते स्थलांतरित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जिल्ह्यातील अनेक भागांना गेल्या दोन दिवसांमध्ये झालेल्या पावसाने झोडपून काढले आहे. जिल्ह्यातील ५५ महसूल मंडळांमध्ये ६५ मिलिमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली. जिल्ह्यातील १६३ कुटुंबांमधील ६३२ व्यक्तींना पावसाचा फटका बसला असून, त्यांचे तात्पुरते स्थलांतर करण्यात आले. अतिवृष्टीमुळे शिरूर तालुक्यातील निमगाव म्हाळुंगी येथील कामिनी नदीला पूर आल्याने रांजणगाव-निमगाव रस्त्यावरील पुलावरून एक तरुण बुडाल्याची घटना घडली. जिल्ह्यात रविवारी सायंकाळपासून पावसाला सुरुवात झाली. सोमवारी रात्रभर अनेक तालुक्यांमध्ये जोरदार पाऊस झाला. जिल्ह्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरी ८६२ मिलिमीटर एवढा पाऊस पडतो. तर जून ते ऑक्टोबर या कालावधीत पावसाची सरासरी ९४० मिलिमीटर अशी आहे. मात्र, जून महिन्यापासून आतापर्यंत ७४५ मिलिमीटर पावसाची नोंद जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली.

## शारीरिक स्वास्थ्य, पर्यावरण संरक्षणासाठी सायकल चालवा

- **अनुराग ठाकूर यांचे प्रतिपादन**
- **'पुणे ऑन पेडल्स' सायकल रॅलीमध्ये हजारो पुणेकरांचा सहभाग**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"शारीरिक स्वास्थ्य, पर्यावरण सरंक्षणासाठी सायकल चालवणे अतिशय उपयुक्त आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट इंडियाचा नारा दिला असून, त्यांनी दिलेल्या पंचसुत्रीवर पुणेकरांनी आपले आरोग्य चांगले राखावे," असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी



केले. मेधाताईंच्या पुढाकारातून मोदीजींच्या वाढदिवसानिमित्त पुणेकरांनी दिलेली ही अनोखी भेट असल्याचेही ठाकूर म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पुण्यात राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या पुढाकाराने आयोजित पुणे ऑन पेडल्स सायकल रॅली व पुणे वॉकेथॉनमध्ये हजारो पुणेकर सहभागी झाले. सायकल रॅलीचा मार्ग कोथरूडमधील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते झाशीची राणी लक्ष्मीबाई पुतळा, बालगंधर्व चौक, तर वॉकेथॉनचा मार्ग एसएनडीटी महाविद्यालयापर्यंत होता. पुणेकरांनी 'सायकल चालवा'चा नारा देत शारीरिक स्वास्थ्य व पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.

माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते रॅलीला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात झाली. प्रसंगी पुणे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, क्रिकेटपटू केदार जाधव, महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे यांची प्रमुख उपस्थिती यावेळी होती. विश्राम कुलकर्णी, जयंत भावे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# देशसेवा फाउंडेशनचा सेवाभावी प्रवास

## माणुसकीच्या वाटेवर चालणारा विश्वासाचा हात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजातल्या दुर्लक्षित घटकांसाठी काम करणारी माणसं आजकाल फारच क्वचित दिसतात. अनेक वेळा समाजसेवा ही केवळ प्रसिद्धीपुरती किंवा राजकीय फायद्यासाठी केली जाते, अशी धारणा आहे. पण या रूढ कल्पना मोडून समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करणारी पुण्यातील एक संस्था म्हणजे देशसेवा फाउंडेशन. गेल्या काही महिन्यांपासून ही संस्था कुठलाही गाजावाजा न करता नि:स्वार्थ समाजसेवा करत असून, खरं 'दान' म्हणजे काय याचं जिवंत उदाहरण बनली आहे.



**शब्दांकन : सुरेखा सावंत-मते**

**नावापुरती नव्हे, तर कृतीतली समाजसेवा :**

देशसेवा फाउंडेशनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ही संस्था प्रसिद्धी, राजकीय लाभ किंवा पाठिंबा यापैकी कुठल्याही मोहात न अडकता गरजूंना मदतीचा हात पुढे करते. गरज ओळखून तात्काळ कृती करणे आणि ती मदत योग्य ठिकाणी पोहोचवणे हेच त्यांचं ध्येय आहे.

**राशन किट्सपासून च्यवनप्राश वाटपापर्यंत विविध उपक्रम :** लॉकडाऊनच्या काळापासून आजवर संस्थेने १००० हून अधिक राशन किट्स वितरित करून असंख्य गरीब, कामगार, वृद्ध, विधवा आणि एकल कुटुंबांना आधार दिला आहे.

**● संपर्क माहिती ●**

**देशसेवा फाउंडेशन, पुणे**
**संपर्क: 8698783400**
**अध्यक्ष: नरेंद्र पारखे**
**सचिव: अमोल हांडे**

*याशिवाय संस्थेने सुरू केलेले उपक्रम:*
*आषाढी एकादशीनिमित्त १०० तुळशीची रोपे वाटप*
*महिलांसाठी दर महिन्याला सॅनिटरी नॅपकिन्स वाटप*
*वृद्धांसाठी च्यवनप्राश वितरण*
*लहान मुलांना ओडोमॉस बँड वाटप*

हे उपक्रम फक्त मदतीपुरते मर्यादित न राहता, लोकांच्या आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षिततेकडे लक्ष देणारे आहेत.

**प्रशासकीय मदतीतही पुढाकार :** देशसेवा फाउंडेशन फक्त अन्न किंवा वस्त्रपुरतं काम करत नाही. उलट, त्यांनी वृद्धांना पेन्शन मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन, फॉर्म भरण्याची मदत, तसेच बँकांमधील अडचणी सोडवणे अशा अनेक कार्यात हातभार लावला आहे. त्यामुळे या संस्थेचं काम केवळ देणगीपुरतं न राहता, प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता यावं यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.


**पारदर्शक कार्यशैलीमुळे लोकांचा वाढता विश्वास :** देशसेवा फाउंडेशनची सर्वात मोठी ताकद म्हणजे पारदर्शकता. नागरिकांना खात्री आहे की त्यांनी दिलेली मदत योग्य ठिकाणीच पोहोचेल. त्यामुळे अनेक लोक आता या संस्थेशी स्वतःहून संपर्क साधून दान देतात किंवा मदतीसाठी पुढाकार घेतात. या विश्वासामुळे संस्था समाजाच्या अधिक जवळ पोहोचत आहे.

**एक सामाजिक आवाहन :** देशसेवा फाउंडेशनच्या कार्यातून एकच संदेश स्पष्टपणे उमटतो:

"जर तुमच्याकडे थोडं जास्त आहे,
तर ते अशा कुणाला द्या,
ज्याच्याकडे काहीच नाही."

**- समाप्त**

### "ही सेवा क्षणिक नाही - हेच आमचं आयुष्य"



**"मी कुठल्याही पक्षाशी जोडलेलो नाही. पण समाजातली वेदना, उपेक्षा आणि दुर्लक्षितता पाहून मन हेलावलं. म्हणून ही सेवा सुरू केली. ही केवळ मदत नाही, तर माणुसकीचं उत्तर आहे. सेवा हा आमचा छंद नाही, तर आमचं आयुष्य आहे."**

**मा. श्री. नरेंद्र पारखे, संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.